**फौजदारी अर्ज (डी.व्ही.) क्र.३०/२०२२.**
**निलम विनायक चिले व इतर विरूध्द विनायक ज्ञानदेव चिले व इतर.**

**निशाणी क्रमांक ४ व १८ वर संयुक्तिक आदेश.**

कौटुंबीक हिंसाचार झाला करीता स्वत: व्यथित स्त्री आहे तसेच स्वत:चे पालन पोषण करण्यास असमर्थ आहे असे केथन करत अर्जदार क्र.१ की जी उत्तरवादी यांची पत्नी आहे तर अर्जदार क्र.२ व ३ की जी त्याची अज्ञान अपत्य आहेत त्यांनी कौटुंबीक हिंसाचारापासून महिलांचे रक्षण करणारा अधिनियम, २००५ मधील तरतुदी नुसार अर्ज दाखल करत विविध अनुतोषांची मागणी केली. मागणी केलेले इतर अनुतोष पुराव्याअंति प्रकरण गुणदोषावर निर्णयीत होतेवेळी दिले जातील तथापि, आता तातडीची बाब म्हणून अंतरिम पोटगी द्यावी अश्या अनुतोषाची मागणी केली.

**(२)** मुळ अर्ज, अंतरिम पोटगी मागणीचा अर्ज, उत्तरवादी यांनी दाखल केलेले लेखी म्हणणे यासह संचिकेवर उपलब्ध कागदोपत्री पुराव्याचे बारकाईने अवलोकन केले. सविस्तर युक्तीवाद ऐकला.

**(३)** **मान्य व कबुल बाबी :—**
**(अ)** नातेसंबंध **(ब)** अर्जदार क्र.२ व ३ अज्ञान **(क)** अर्जदार नोकरीस नाहीत.

**(४)** प्रस्तुत प्रकरणाव्यतिरिक्त फौजदारी अथवा दिवाणी प्रकरणामध्ये उत्तर वादी यांच्याकडून अर्जदार यांना अन्नवस्त्राची रक्कम मिळत नाही असे कळविले.

**(५)** रजनीश वि.नेहा या न्यायनिर्णयामध्ये ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वांची पुर्तता म्हणुन उभय पक्षकारांच्या वतीने उत्पन्न व दायित्वाची शपथपत्रे दाखल केले नाही.

**(६)** पत्नी असो अथवा अपत्य भले ते औरस असो की, अनौरस असो, निर्वाहा करीता आदेश पारीत करण्यापुर्वी हे पाहणे जरुरी की, ते स्वत:चे पालनपोषन करण्यास असमर्थ आहेत काय.? त्यांच्याकडे उत्पन्नाचे पुरेसे साधन आहे काय.? उत्तर वादी यांच्याकडे त्यांना स्वतंत्र खावटी देण्यासाठी उत्पन्नाचे पुरेशे साधन आहे काय.? मुळात उत्तरवादी यांच्याकडे पुरेशी आर्थिक ऐपत या एकाच बाबीचा विचार करता अंतरीम पोटगीचा आदेश पारीत करता येणार नाही. वर नमुद बाबींच्या अगोधर मुळात

प्रथम कौटुंबीक हिंसाचार झाला आहे काय.? त्याकरीता न्यायालयाचे प्रथमदर्शनी समाधान होईल इतपत पुरावा आहे काय या बाबी पहाव्या लागणार आहे.

**(७)** अर्जदाराच्या वतीने युक्तीवाद की, उत्तरवादी यांनी अर्जदारांचा सांभाळ करण्यास उपेक्षा केली / नकार दिला. या ठिकाणी मी नमुद करतो की, मुळात प्रस्तुतचे प्रकरण हे फौ.प्र.सं.कलम १२५ प्रमाणे दाखल नाही. कौ.हि.म.र.अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार दाखल प्रकरणामध्ये आदेश नोंदवितेळी कौटुंबीक हिंसाचार झाला काय.? मुख्यत्वे ही बाब पहाणे जरूरी. 'कौटुंबीक हिंसाचार' ही बाब 'सांभाळ करण्यास उपेक्षा/नकार' यापेक्षा भिन्न आहे. 'सांभाळ करण्यास उपेक्षा/नकार' याच्याशी त्याचा थेट संबध जोडता येणार नाही. त्यामुळे 'सांभाळ करण्यास उपेक्षा/ नकार' यावरून खावटी देणे हे अधिकार क्षेत्राबाहेरील बाब आहे.

**(८)** कौटुंबीक हिंसाचार झाला काय.? याची उकल होण्याकरीता संचिकेवरील उपलब्ध पुराव्याचे अवलोकन केले. पैशाची मागणी, अपमानास्पद वागणूक, मारहाण, शिवीगाळ शारीरीक व मानसीक छळ असे थेट आरोप केले आहेत. कलम ३ मध्ये कौटुबींक हिंसाचाराची व्याख्या स्पष्ठ आहे. त्यामध्ये पतीने किंवा उत्तरवादीने केलेले कोणतेही कृत्य, लोप पावलेले कृत्य किंवा कृति किंवा वागणूक ज्यावेळी हिंसाचार म्हणून स्पष्ठ होईल अश्या वेळी पुढील गोष्टींचा हिंसाचार म्हणून ठरविला गेला आहे. आरोग्यास, सुरक्षीततेस, जीवीतवास किंवा स्वास्थ्यास, मानसीक किंवा शारीरीक दुखापती किंवा लैंगीक गैरवर्तन, अवयवायांना दुखापत, शाब्दीक, भावनीक आणि आर्थीक गैरवर्तन या गोष्टींचा समावेश केला आहे. त्रास देणे, दुखापत करणे, जखमी करणे, व्यथित व्यक्तीचा जीव धोक्यात आणण्यास भग पाडणे, तिच्या कोणत्याही दुखापतीस कारणीभुत होणे या बाबी देखील समाविष्ठ आहेत.

**(९)** उपलब्ध्द पुराव्यावरून कलम ३ प्रमाणे कौटुबींक हिंसाचार झाला आहे ही बाब प्रथमदर्शनी सिध्द होत आहे. अर्जदाराने केलेले सर्व विरूध्द कथन उत्तरवादी यांनी स्पष्ठ नाकारले आहेत. तथापि, ही बाब दुर्लक्षीत करता येणार नाही की उत्तरवादी व अर्जदार हे आज रोजी विभक्त राहत आहेत. कोणतेही भारतीय स्त्री कोणताही त्रास नसताना पतीचे घर सोडून स्वत:च्या मर्जीने विभक्त राहणार नाही. कौ.हिं.म.रक्षण करणारा अधिनियमाचे कलम १७ अन्वये पत्नीच्या अधिकाराची तरतुद करण्यात आली आहे. पत्नीला फक्त सांभाळणे एवढाच अधिकार तीला नसुन तीला राहण्याचा

अधिकार सुध्दा या अधिनियमान्वये देण्यात आलेला आहे. राहण्याचा हक्क हा ज्या मालमत्तेमध्ये पतीचा हिस्सा असेल त्या मालमत्तमध्ये रहाण्याचा सर्वात जादा अधिकार देण्यात आलेला आहे.

**(१०)** अर्जदार स्वत:च्या मर्जीने उत्तरवादी यांच्यापासून विभक्त राहत आहेत असे दर्शविणारा पुरावा संचिकेवर नाही. संचिकेवर अशी कोणतीही बाब नाही की ज्यायोगे असे म्हणता येईल की, उत्तरवादी यांनी एकाच वेळी मोठी रक्कम अर्जदाराला दिली आहे किंवा पैश्याचे स्त्रोत असलेली एखादी मिळकत तिला दिली आहे आणि त्या रकमेचा विनीयोग करून अर्जदार स्वत:चा उदरनिर्वाह करू शकतात.अर्जदार नोकरीस आहे त्यांच्याकडे उत्पन्नाचे स्वतंत्र सधन साधन आहे असे देखील उपलब्ध पुराव्यावरून दिसून येत नाही.

**(११)** उत्तरवादी यांनीच अर्जदारांचा त्याग केला की अर्जदार स्वत:हून विभक्त राहत आहेत यासह तत्सम बाबींवर योग्य वेळी उहापोह केला जाईल. पतीपासून विभक्त राहणारी कोणतीही स्त्री उपजीवीकेसाठी काहीतरी करणारच आहे. जरी क्षणभर गृहित धरले की काही तरी छोटेमोठे कामधंदा करून ते स्वत:चा चरितार्थ भागवत आहेत तथापि, ती बाब म्हणजे त्या स्वत:चा चरितार्थ चालविण्यास समर्थ आहेत असे होणार नाही. बादशाह वि.उर्मिला एस.एम.पी.क्र.८५९६/२०१३ फौ.अर्ज क्र.१९५३०/१३ या प्रकरणामध्ये मार्गदर्शक तत्व आपणास लक्षात घेता येईल. चरितार्थ भागविण्याकरीता एखादे छोटे मोठे काम केले त्या एका बाबीवरुन पत्नी अन्नवस्त्राची रक्कम मिळण्यास अपात्र ठरणार नाही. सुधा पाटील वि.राजकुमार रवी पाटील १९९७ (२)एम.एल.जे. २५० या प्रकरणामध्ये तर अंध पतिस देखील पत्नीला पोटगीची रक्कम देण्यास आदेशीत केले होते. हरदेव सिंग विरूध्द उत्तर प्रदेश सरकार १९९५ क्री.लॉ.ज.१६५२ या प्रकरणामध्ये तर असे ठरविले की ‘‘पती हा साधु जरी झाला तरी तो पत्नी व मुलांचा सांभाळ करण्याची जबाबदारी टाळू शकत नाही.’’. संदिप वि.सुमन या प्रकरणा मध्ये ना.पंजाब व हरियाणा उच्च न्यायालयाने असे ठरविले आहे की, स्वत:चा चरितार्थ चालविण्यास सक्षम नसलेल्या पत्नीस सांभाळणे ही केवळ कायदेशीर नाही तर नैतीक जबाबदारी आहे आणि पती हा प्रोफेशनल भिक्षूक जरी असला तरी तो ती जबाबदारी टाळू शकत नाही. अर्जदार क्र.१ यांनी पुर्नविवाह केला असे कथन नाही. उलटपक्षी ती उत्तरवादी यांनी जन्म दिलेल्या अर्जदार क्र.२ हिचा सांभाळ करत आहे.

**(१२)** या प्रकरणात तर उत्तरवादी तरुण आहेत. निश्चीतच कष्ट करण्याची धमक असलेले त्याचे वय आहे. गजेंद्र सिंग यादव वि.श्रीमती बिंदु यादव, मणु/आर.एच / ३११/२०१३ राजस्थान या प्रकरणामध्ये ठरविल्या प्रमाणे पत्नीचा सांभळ करणे ही पतीची जबाबदारी आहे. उत्तरवादी हे त्यांना खावटी देण्यास सक्षम असल्याचे दिसून येत आहे. उत्तरवादी याचे असे कोठेही म्हणने नाही की, अर्जदार व तो उभयतांच्या संमतीने विभक्त राहत आहेत. पत्नीविरूध्द जे काही आरोप केले आहेत निश्चीत सबळ पुरावा सादर केल्यास पत्नीच्या विरूध्द देखील विरूध्द आदेश पारीत केले जातील तथापि, त्याकरीता गुणदोषावर प्रकरण निर्णयीत होईपर्यत थांबावे लागेल. तातडीने त्या वर ठाम असे मत नोंदविता येणार नाही.

**(१३)** मुळात अंतरिम पोटगी मंजुर करण्याचा उद्येश हा टु प्रिव्हेंट द डेस्टीटयुशन व व्हॅग्रन्सी असा आहे. पतीच्या स्टेटसप्रमाणे जीवन जगण्याचा समान हक्क व अधिकार पत्नी या नात्याने अर्जदारांचा आहे. दैनंदिन गरजेच्या वस्तुंच्या किंमतीमध्ये वाढ झाली आहे याबाबत न्यायालय स्वत:हून दखल घेवू शकते.

**(१४)** मुळात या प्रकरणामध्ये त्रयसी महिलेसोबत काहीतरी संबध होते ही बाब उत्तर वादी क्र.१ हे देखील नाकारत नाहीत. प्रकरणाची परिस्थिती पाहता, नातेसंबंध, दैनंदीन गरजांकरीता पैश्याची निकड याचा विचार केला. उत्तरवादी यांच्याकडे येणेप्रमाणे उत्पन्नाचे साधन दिसून येत आहेत. ते नोकरीत असताना त्यांना नियमीत वेतन मिळत असल्याचे दिसून येत आहे. श्री विघ्नहर्ता एस आर ए सहकारी गृहनिर्माण संस्था, लोअर परेल, गणेशनगर, प्रभादेवी, मुंबई येथे झोपडीधारक म्हणून उत्तरवादी क्र. १ यांच्या वडीलांची नोंद आहे. मौजे मानवळे, ता.भुदरगड जिल्हा कोल्हापूर येथील गट क्र.२८ व ५२२ मध्ये उत्तरवादी क्र.१ यांच्या वडीलांची नोंद आहे.

**(१५)** उभय पक्षकारांचे वय, सध्या आवश्यक गरजा भागविण्यासाठी लागणार खर्च, त्यांचे उत्पन्न, त्यांच्यावर अवलंबुन असलेले सदस्य, शिक्षण दवाखाना करीताचा खर्च, या सर्व बाबी विचारात घेतल्या. तरूण चढ्ढा वि.करिश्मा २०१३(३) अे.डी.दिल्ली ५२४ या प्रकरणा मध्ये ठरविल्याप्रमाणे पतीचे उत्पन्नाचे स्त्रोत स्पष्ठ नसेल तर पत्नीचे कथने विचारात घेता येतील.

**(१६)** दु:खी महिला पर्यत पतीच्या दुर्वव्यवहाराच्या वागणुकीमुळे वैवाहीक घरात किंवा सामाईक घरात राहण्यास असमर्थ आहेत अश्या महिलांपर्यत या हितकाराक कायद्याचा

फायदा पोहचविणे जरूरी. कलम दोन (क) अन्वये अर्जदार हे पिडीत व्यक्ती आहे असे जाणवत आहे. सर्व विवेचना वरुन कौटूंबीक हिंसाचार झाल्याचे, स्वत:चे पालन पोषन करण्यास अर्जदार असमर्थ यासह उत्तरवादी यांच्याकडे उत्पन्नाचे पुरेसे साधन आहेत असे प्रथमदर्शनी दिसून येत असल्यामुळे अंतरीम अनुतोष देणे जरूरी वाटते.

**(१७)** दोन्ही बाजुंनी पुरावा नोंदविल्यानंतर प्रकरण गुणदोषावर निर्णयीत केले जाणार आहे. त्यावेळी अंतरीम पोटगीच्या रकमेमध्ये कमी अधिक बदल देखील केला जावू शकेल. जर कौटूंबिक हिंसाचारच झाला नाही ही बाब सिध्द झाल्यास प्रकरण खारीज देखील केले जाईल. मतीतार्थ इतकांच की तात्पुरती व्यवस्था म्हणून सदरचा आदेश पारीत केला आहे. कोणतेही ठोस मत नोंदविलेले नाही. त्यामुळे उभय बाजुंनी मंजुर केलेल्या रकमेबाबत जास्त वाद न करता प्रकरण तातडीने निर्णयीत करण्याकरीता न्यायालयास सहकार्य करावे.

**(१८)** माझे स्त्रीधन उत्तरवादी हे घेवून गेले असे कथन करत दोन तीन सोन्याच्या दागीण्याची नावे नमुद केले म्हणजे त्या कथनाच्या आधारे उत्तरवादी यांना स्त्रीधन परत करा असा आदेश पारीत करणे संयुक्तीक होणार नाही. परस्त्री सोबतच्या फोटोच्या आध ारे ठोस मत आत्ताच नोंदविता येणार नाही. दस्तांचे वादतथ्य, संबध्दता, दस्तऐवज शाबीती, त्याच्या खरेपणाबाबतची गृहितके, शाबितीची जबाबदारी, स्वीकार्य पुरावा, व त्याच्या सत्यवादीत्वाबाबत निर्णय या स्अेजला नोंदविता येणार नाही. करीता खालील प्रमाणे आदेश.

## आदेश

**१.** अर्ज निशाणी क्रमांक ४ अंशत: मंजूर केला.

**२.** अर्ज निशाणी क्रमांक १८ या स्टेजला नामंजुर.

**३.** उत्तरवादी क्र.१ विनायक ज्ञानदेव चिले यांस आदेशीत करण्यात येते की, त्यांनी सदर अर्ज दाखल तारखेपासून अर्जदार क्र.१ ते ३ यांना प्रतिमहा अनुक्रमे रक्कम रू.५०००/— प्रमाणे अंतरिम अन्न वस्त्राची रक्कम द्यावी.

**४.** या व्यतिरिक्त सदर अर्जाचा खर्च म्हणुन उत्तरवादी यांनी अर्जदारांस रक्कम रु.५०००/— द्यावी.

**५.** उत्तरवादी यांनी प्रस्तुत अर्ज न्यायप्रविष्ठ असताना अर्जदारास कोणतीही शारीरीक व मानसीक इजा पोहचवू नये, कौटूंबिक हिंसाचाराचे कोणतेही कृत्य करु नये.

**६.** कौटुंबीक हिंसाचारापासून महिलांचे रक्षण करणारा अधिनियम, २००५ कलम २४ प्रमाणे आदेशाची प्रत अर्जदारास विनामुल्य देण्यात यावी.

**७.** सदर न्यायनिर्णयाविरूध्द नाराज असल्यास उभयतांना मा.वरिष्ठ न्यायालयाकडे दाद मागता येईल.

**८.** संबधीत पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिका—याने सदर आदेशाची अंमलबजावणी होण्याकरीता मदत करावी.

**९.** प्रकरण अंतिमतः गुणदोषावर निर्णयीत करतेवेळी, सदर आदेशामधील कोणतीही बाब उभय पक्षकारापैकी कोन्हासही पुरक अथवा बाधक राहणार नाही.

**१०.** सर्व कायदेशीर मुद्ये खुले ठेवले.

**न्यायनिर्णय खुल्या न्यायालयामध्ये अधिघोषित करण्यात आला.**

Digitally signed by GHULE GANESH AMBADAS
Date: 2023.09.06 14:36:34 +0530

( गणेश अंबादास घुले )
न्यायदंडाधिकारी वर्ग १, इचलकरंजी.
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर.
न्यायालय क्र.३
जे.ओ.कोड : २५९४.

दिनांक :०१/०९/२०२३.

**प्रमाणपत्र**

मी अशी खात्री देतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेमधील मजकूर मुळ न्यायानिर्णयाप्रमाणे / आदेशाप्रमाणे प्रत्येक शब्द बरोबर आहेत.

लघुलेखकाचे नांव — संकेत संजय भोपळे
न्यायालयाचे नांव — ३रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर व न्यायदंडाधिकारी वर्ग १, इचलकरंजी.

| | |
|---|---|
| आदेश दिनांक | : ०१.०९.२०२३. |
| पिठासिन अधिका—यानी स्वाक्षरी केलेला दिनांक | : ०६.०९.२०२३. |
| आदेश/न्यायनिर्णय अपलोड केलेला दिनांक | : ०६.०९.२०२३. |